# खरेदीचा नैसर्गिक अनुभव मिळावा, यासाठी फ्लिपकार्टकडून आवाज आधारित मदतीचा शुभारंभ

हिंदी व इंग्रजी भाषेतील हा नवा आवाज आधारित सहायक फ्लिपकार्टच्या सुपरमार्ट या ग्रोसरी स्टोअरवर उपलब्ध

**बंगळुरू, ९ जून २०२०** : फ्लिपकार्ट या संपूर्णपणे भारतीय ई-कॉमर्स व्यासपीठाने आपल्या ग्राहकांचा ई-कॉमर्स अनुभव सोपा आणि अधिक नैसर्गिक व्हावा, या हेतूने आपल्या व्यासपीठावर आवाज आधारित साहय सुविधा सुरू केली आहे. फ्लिपकार्टच्या सुपरमार्ट या ग्रोसरी स्टोअरमध्ये सुरू करण्यात आलेल्या या आवाज आधारित सहायकाच्या सुविधेमुळे ग्राहकांना विविध भाषांमधील व्हॉइस कमांडच्या माध्यमातून आपल्याला हव्या असलेल्या वस्तूंचा शोध घेऊन खरेदी करणे सुलभ होणार आहे. सुरुवातीला ही सुविधा हिंदी आणि इंग्रजी या भाषांमध्ये उपलब्ध आहे.

**आवाज आधारित सहायकामागील तंत्रज्ञान**

फ्लिपकार्टच्या अंतर्गत तंत्रज्ञान चमूने व्हॉइस-फर्स्ट कॉन्व्हर्सेशनल एआय प्लॅटफॉर्म विकसित केला असून यामध्ये स्पीच रेकग्निशन, नॅचरल लँग्वेज अंडरस्टँडिंग, मशीन ट्रान्स्लेशन आणि टेक्स टु स्पीच फॉर इंडियन लँग्वेजेस आदी सोल्यूशन्सचा अंतर्भाव आहे. हिंदीसारख्या स्थानिक भाषा, ई-कॉमर्समधील विविध श्रेणी व उत्पादने, तसेच उत्पादनाचा शोध घेणे, उत्पादनाचा तपशील समजून घेणे, ऑर्डर नोंदवणे आदी कामांसाठी ही सोल्यूशन्स सक्षम आहेत. वापरकर्त्याने उच्चारलेली भाषा आपसूक ओळखून प्रत्यक्ष वेळेत त्याचे भाषांतर करण्यासाठी आणि वापरकर्त्याचा हेतू ओळखून विविध भारतीय भाषांमध्ये त्याच्याशी खरेदीशी संबंधित संवाद साधण्यासाठी स्वत:चे असे एआय प्लॅटफॉर्म विकसित केले आहे.

फ्लिपकार्टने देशाच्या विविध भागांमध्ये पाच महिन्यांच्या कालावधीत एथनोग्राफिक (वांशिक) अभ्यास करून सखोल माहिती मिळवली, संधींचा शोध घेतला आणि त्यानुसार ग्रोसरीसाठी आवाज आधारित सहायक विकसित केला. या अभ्यासातून आवाजाचा वापर करून विविध प्रकारची कामे करण्याबरोबरच सेवेची सहज उपलब्धता हवी असलेल्या ग्राहकांकडून अनेक प्रकारची रोचक माहिती मिळाली. त्यामुळे या आवाज आधारित सहायकामुळे ग्राहकाचा ग्रोसरी खरेदीचा अनुभव अधिक व्यक्तिगत आणि नैसर्गिक होईल, असा फ्लिपकार्टला विश्वास आहे.

प्रत्यक्ष आयुष्यात ज्याप्रमाणे आपण दुकानदाराशी बोलून जीवनोपयोगी/दैनंदिन गरजेच्या वस्तूंची खरेदी करतो, त्याचप्रमाणे हा आवाज आधारित सहायक ग्राहकाशी संवाद साधून त्याला खरेदीसाठी साहय करणार

आहे. इंग्रजी आणि हिंदी या दोन्ही भाषांमधील वैविध्यपूर्ण कमांड्स समजून घेण्याची यात क्षमता असून संमिश्र भाषेतील कमांड्सना प्रतिसाद देण्याचीही क्षमता आहे.

दैनंदिन गरजेच्या वस्तूंची खरेदी करताना ग्राहकाला विशिष्ट उत्पादनाविषयी संपूर्ण माहिती आवश्यक असते. त्यांची ही गरज फ्लिपकार्टच्या आवाज आधारित सहायकामुळे पूर्ण होणार असून याच्या मदतीने ग्राहक अत्यंत कमी वेळेत आणि सफाईदारपणे आवश्यक वस्तूंची खरेदी करून सुलभ आणि नैसर्गिक खरेदीचा आनंद मिळवू शकतील.

**फ्लिपकार्टचे मुख्य उत्पादन व तंत्रज्ञान अधिकारी जयेंद्रन वेणुगोपाल** म्हणाले, *"संपूर्णत: भारतात विकसित झालेली ई-कॉमर्स कंपनी या नात्याने फ्लिपकार्ट भारतात विकसित होऊन वापर होत असलेल्या (इंडिया फर्स्ट) कल्पक उत्पादनांच्या शोधात आघाडीवर असून व्हिडिओ, व्हरनॅक्युलर आणि व्हॉइस हे भारतात ई-कॉमर्सचा अवलंब व्हावा, यासाठीचे तीन महत्त्वाचे घटक आहेत. व्हिडिओ आणि व्हरनॅक्युलर या घटकांचा मोठ्या प्रमाणावर लाभ झालेला दिसून येत असून व्हॉइस कपॅबिलिटी म्हणजेच आवाज आधारित क्षमता हे यापुढचे पाऊल आहे."*

*"ग्रोसरीच्या खरेदीसाठी साह्यभूत ठरणाऱ्या आवाज आधारित क्षमतेशी निगडित विविध अंगांचा अभ्यास करण्यासाठी फ्लिपकार्टच्या तंत्रज्ञान चमूने देशभर प्रवास केला आणि विविध भारतीय भाषांमध्ये असलेला वैविध्यपूर्ण लहेजा ओळखून त्यानुसार प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित केली. ग्राहक अधिक मोठ्या संख्येने आवाज आधारित ऑनलाइन कॉमर्सचा अवलंब करत असतानाच फ्लिपकार्टच्या या आवाज आधारित सहायक सुविधेचा शुभारंभ होत आहे," असेही ते म्हणाले.*

**फ्लिपकार्टच्या ग्रोसरी व जनरल मर्कंडाइज आणि फर्निचरचे एसव्हीपी मनीष कुमार** म्हणाले, *"संवादावर आधारित खरेदी अत्यंत नैसर्गिक असून आम्हाला आमच्या ग्राहकांना खऱ्या अर्थाने अगदी नैसर्गिक भासेल असा संवादी खरेदीचा अनुभव द्यायचा होता. आम्ही स्वत: विकसित केलेल्या आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार असलेला आवाज आधारित सहायक सुरुवातीला ग्रोसरी विभागासाठी सुरू करण्यात आला असून ग्राहकांना खरेदीत मदत मिळून अगदी सुलभ खरेदीचा अनुभव मिळेल. भारतीय ई-कॉमर्स क्षेत्रामध्ये ग्रोसरी विभाग अद्याप फारसा प्रचलित झालेला नाही. त्यामुळे यामध्ये विकासाला आणि ग्राहककेंद्री होण्याला मोठा वाव आहे. गेल्या वर्षभराच्या कालावधीत आमचा ग्रोसरी व्यवसाय लक्षणीयरित्या वाढला असून आवाज आधारित क्षमतेची सुरुवात करण्यासाठी आमच्यासाठी ही अगदी योग्य वेळ आहे."*

अँड्रॉइड डिव्हाइसवर फ्लिपकार्टच्या मोबाइल अॅपचा वापर करणाऱ्या सर्व वापरकर्त्यांना सध्या हिंदी आणि इंग्रजी भाषेतून ही सेवा उपलब्ध असून यथावकाश आयओएस आणि वेबसाइटवरही ती उपलब्ध होणार आहे. ग्रोसरीसाठीच्या या आवाज आधारित सहायकाची सुरुवात करून फ्लिपकार्टने आपल्या कल्पक शोधांचे एक दशक पूर्ण केले असून ग्राहककेंद्रित सोल्युशन्स विकसित करण्यासाठी फ्लिपकार्ट ओळखली जाते.

**About Flipkart**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India's fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

For more details contact media@flipkart.com.